वर्ष- १० | अंक- १७ | मुंबई, मंगळवार, १२ मार्च ते १८ मार्च २०२४ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक


PG 2 सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश


3 → प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडाला

जांभळ्या ताऱ्याचे रहस्य ← 4



www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com


# २ कोटी ६४ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी उपजिल्हा अधिकारी स्वाती सूर्यवंशी यांना अटक

**परभणी , प्रतिनिधी**

शासकीय प्रकल्पासाठी जमिनीचे अधिग्रहण करताना झालेल्या 2 कोटी 64 लाख रुपयांच्या अपहारप्रकरणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे परभणीच्या विद्यमान उपजिल्हाधिकारी व वर्ध्याच्या तत्कालीन भूसंपादक अधिकारी स्वाती सूर्यवंशी यांच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेमुळे महसूल प्रशासन वतुर्ळात खळबळ उडाली आहे. यापूवीर्ही सूर्यवंशी यांच्या विरोधात कारवाई करण्यात आली होती, परंतु उघडकीस आलेल्या घोटाळ्याची व्यापकता पाहता अखेर जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेतला.



महसूल विभाग आणि वर्धा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वाती सूर्यवंशी 17 फेब्रुवारी 2022 रोजी रुजू झाल्या होत्या. 12 फेब्रुवारी 2024 पर्यंत लघुसिंचन कालवे प्रकल्पाच्या उपजिल्हाधिकारी म्हणून त्या कार्यरत होत्या. शासकीय प्रकल्पासाठी जमिनीचे अधिग्रहण करण्यास मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्या जात असतो. त्याची जबाबदारी संबंधित उपजिल्हाधिकाऱ्यांची असते. त्या पदावर असणाऱ्या स्वाती सूर्यवंशी यांनी शासकीय निधीचा अपहार केल्याची माहिती वर्धा जिल्हाधिकाऱ्यांना मिळाली होती.

जिल्हाधिकाऱ्यांनी लगेच सूर्यवंशी यांच्या कार्यालयातील कागदपत्रे सील केली. कार्यालयातील कागदपत्र सील केल्यानंतर या प्रकरणी चौकशी समितीची नेमणूक करण्यात आली. यात काही शेतकऱ्यांच्या नावे 2 कोटी 13 लाख 311 रुपये बनावट कागदपत्रे सादर करीत काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले. चौकशीत समुद्रपूर तालुक्यातील 25 वर्षांपूर्वी वाटप झालेल्या 16 प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रकरणही उघडकीस आले. कोशागार कार्यालयातील शासकीय खात्यातून 5 लोकांच्या नावे 50 लाख 85 हजार 424 रुपये दोन पतसंस्थेत खोटी खाती उघडून वळते केल्याचे दिसून आले. 25 वर्षांपूर्वी निवड झालेल्या शेतकऱ्यांचे नाव निवाड्यात नव्हती. मोबदला मिळावा म्हणून ज्यांनी अर्जसुद्धा सादर केला नाही, अश्याही लोकांच्या नावाने पैसे उचलण्यात आलेत. खात्यात पैसे जमा करीत नंतर ते काढण्यात आल्याचे निर्दशनास आले आहे. वर्धेच्या उपजिल्हाधिकारी स्वाती सूर्यवंशी यांच्यावर पूर्वी काही प्रकरणात कारवाई झाली होती. अशा सर्व बाबी लक्षात घेता हा मोठा भ्रष्टाचार असल्याचे सिद्ध झाल्यावर जिल्हाधिकारी राहुल कडीर्ले यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

जिल्हाधिकाऱ्यांकडून तक्रार प्राप्त होताच शहर पोलिसांनी विविध कलमन्वये गुन्हे दाखल केले आहेत. सध्या हे प्रकरण महसूल खात्यात चांगलेच खळबळ उडविणारे ठरत आहे. त्यामुळे या प्रकरणातून नेमके काय निष्पन्न होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## खुनाच्या गुन्ह्यातील पॅरोल रजेवरील फरार गुन्हेगारास पोलिसांनी केली अटक

**काशिमीरा , प्रतिनिधी**

खुनाच्या गुन्हयामध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असतांना पॅरोल रजेवरून २०१७ पासुन पळुन गेलेल्या आरोपीतास ७ वर्षांनी अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश. अधिक माहीतीनुसार काशिमीरा पोलीस ठाणे येथील दाखल गुन्ह्या मध्ये मा. ठाणे न्यायालयाने आरोपी यकीनअली नासीरअली शेख वय ३६ वर्ष, रा. गौरव संकल्प फेज ४, रुम नं. ४०२, रवी गृप, मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे यास जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सदर आरोपी हा कळंबा मध्यवर्ती कारागृह कोल्हापुर येथे शिक्षा भोगत असताना तो सन २०१७ मध्ये अिभवचन रज-वर सुटलेला होता. अभिवचन रजा संपल्यानंतर दिनांक १८/०२/२०१७ रोजी ५.०० वाजता कळंबा कारागृह, कोल्हापुर येथे रजेवरुन हजर होणे असतांना देखील तो कोल्हापुर कळंबा कारागृहात हजर न होता पळुन गेलेला होता. त्याच्या विरुद्ध पो. शि. राजु नारायण शिंदे नेमणुक कळंबा कारागह जिल्हा कोल्हापुर यांनी दिलेल्या फियार्दी वरुन कशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.



मा. पोलीस आयुक्त सो, मा अपर पोलीस आयुक्त सो व मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) सो यांनी मिरा भाईंदर वसई वरार पोलीस आयुक्तालयात क्षेत्रात गुन्ह्यातील पाहीजे व फरारी आरोपीचा शोध घेवुन अटक करण्याबाबत आदेश दिले होते. या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा मार्फत तपास करीत असताना पो. हवा. पुष्पेंद्र थापा यांना मिळालेल्या माहीतीप्रमाणे तपास करण्यात आला.

सदर गुन्हयांतील फरारी आरोपी यकीनअली नासीरअली शेख याची माहीती काढुन त्याचा शोध घेत असताना सदर आरोपी दिनांक ०७/०३/२०२४ रोजी मिळुन आलेला असुन त्यास त्याचे नांव विचारता असल्याने आपले नांव यकीनअली नासीरअली शेख वय ४६ वर्ष, सध्या रा. सन क्लब बिल्डींग, ए विगं , रुम नं. १०८, सफारी हॉटेलच्या मागे, काशिगांव, ता. जि. ठाणे. मुळ रा. राजेश कंपाउंड नाशिर अलि चाळ, रुम नं. ०१, दहिसर पूर्व मुंबई असे सांगीतले आहे.

आरोपी यास ताब्यात घेवुन त्यास पुढील कायदेशीर कारवाई साठी काशिमीरा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आलेले आहे. सदरची कामिगरी मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मागर्दशर्ना खाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.निरी अिवराज कुराडे, सपोनिरी कैलास टोकले. सपो.निरी. प्रशांत गांगुर्डे, सपो. निरी. पुष्पराज सुर्वे, सफौ संदीप शिदे, पो.हवा. संतोष लांडगे, पो. हवा. पुष्पेंद्र थापा, पो. हवा. सिचन हुले, पो. हवा. सिचन सावंत, पो. हवा. विजय गायकवाड, पो. हवा . सिमर यादव, पो.हवा. सुधीर खोत, पो. कॉ. प्रशांत विसपुते, पो. कॉ. सनी सुयवंर्शी, १) पो. शि. गौरव बारी २ ) पो.शि. सौरभ इंगळे, मसुब. किरण आसवले, सफौज. सो चव्हाण सायबर विभाग यांनी केली आहे.

## संघटीतपणे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत अंतरराष्ट्रीय टोळीवर पोलीसांनी केली कारवाई

**विरार, प्रतिनिधी**

संघटीतपणे गंभीर गुन्हे करणाऱ्या सराईत अंतरराष्ट्रीय टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अिधनियम (मोक्का) अंतगर्त गुन्हे शाखा, कक्ष -३ विरार कडुन कारवाई. मिळालेल्या माहीतीनुसार दिनांक ०५/०१/२०२४ रोजी दरोडयाची पुवर्तयारीत असलेले कुख्यात अंतरराष्ट्रीय टोळीतील आरोपी १) मिनष ऊर्फ राजु मोहन चव्हाण, रा. ता. वैजापुर, जि. औरंगाबाद. २) भाऊसाहेब शंकर गवळी, रा. ता. नेवासा, जि. अहमदनगर. ३) रिविंद्र सिगं सुखराम सोलंकी, रा. जि. गुणा, राज्य मध्यप्रदेश. ४) सुखचेन रेवत पवार, रा. जि. गुणा, राज्य मध्यप्रदेश. ५) मॉण्टी नंदु चौहान, जि. गुणा, राज्य मध्यप्रदेश ६) अश्विनी रुपचंद चव्हाण, ता. मीरामपुर, जि. अहमदनगर यांना गुन्हे शाखा कक्ष -३ चे अधिकारी व अंमलदार यांनी कारवाई करुन आरोपी यांना ताब्यात घेवुन त्यांच्या विरुद्ध विरार पोलीस ठाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.




नमुद आरोपी यांनी संघटीतपणे टोळी तयार करुन महाराष्ट्र राज्यातील पालघर, ठाणे, नाशिक, पुणे, सांगली, अहमदनगर, औरंगाबाद, तसेच मध्यप्रदेश व राजस्थान परिसरात खून, खुनासह दरोडा, सशस्त्र दरोडा, हत्येचा प्रयत्न, जबरी चोरी, घर फोडी, चोरी असे अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले असल्याचे पोलीस तपासात निष्पन झाले असुन आरोपी १) सखु चेन रेवत पवार, २) रिविंद्र सिंग सुखराम सोलंकी हे सन २०१८ पासुन राजस्थान व मध्यप्रदेश येथील दरोडयाच्या गुन्ह्यात फरार इनामी गुन्हेगार असुन सदर गुन्ह्याच्या तपासात नमुद अटक आरोपी यांच्याकडुन पोलीस कोठडी दरम्यान मालमत्ते संदभार्चे ७ गुन्हे उघडकीस आले आहे. नमुद आरोपी यांच्या विरुद्ध दिनांक २९/०२/२०२४ रोजी मा. श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो.,मि. भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या परवानगीने महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अटक करण्यात आली असुन ,गुन्हयाचा तपास मा. सो. श्री. मदन बल्लाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त सो., गुन्हे, मि. भा. व.वि. पोलीस आयुक्तालय हे करीत आहे.

सदर कामिगरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि. भा.वि. व पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, पोउपनिरी. अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, सिचन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अविन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म. सु. ब. प्रिवण वानखेडे गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष- ३ तसेच सफौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उत्कृष्टरित्यापार पाडली आहे.

## गवळी टोळीतील फरार आरोपीला बेड्या; गुन्हे शाखेची कामगिरी

**मुंबई , प्रतिनिधी**

कुख्यात अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळी टोळीचा पॅरोलवरील फरारी आरोपीच्या गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या आहेत. नरेंद्र लालमनी गिरी (३९) असे या आरोपीचे नाव असून, तो कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहातून पॅरोल (अभिवचन) रजेवर बाहेर पडून फरार झाला होता. गिरी याला नवी मुंबईतील तुर्भे पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

मुंबईत शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकरहत्याप्रकरणामध्येअरुणगवळीसह ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. २००८ पासून हे सर्व आरोपी हे राज्यातील वेगवेगळ्या कारागृहांत शिक्षा भोगत आहेत. यातील आरोपी नरेंद्र गिरी हा कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत होता. गेल्या वर्षी ११ नोव्हेंबरला पॅरोल मंजूर होऊन तो कारागृहाबाहेर पडला. पॅरोलच्या मुदतीप्रमाणे त्याला ३० जानेवारी २०२४ रोजी कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहात हजर होणे आवश्यक होते. मात्र, कारागृहात हजर न होता तो फरार झाला. कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने या प्रकरणी नवी मुंबईतील तुर्भे पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार आरोपी गिरीविरोधात भादंवि कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्याकक्ष३चेप्रभारीपोलीसनिरीक्षकदीपक सुर्वे यांच्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू करत आरोपी गिरी याचा माग काढण्यास सुरुवात केली. गिरी हा वेगवेगळ्या राज्यांमध्ये सतत वास्तव्याची ठिकाणे बदलून पोलिसांना गुंगारा देत होता. बुधवारी रात्री तो नवी मुंबईतील घणसोली परिसरात येणार असल्याची माहिती मिळताच सुर्वे यांच्या नेतृत्वातील पथकाने सापळा रचून रात्री ११.३० च्या सुमारास त्याला जेरबंद केले.

# ऑनलाईन वर्कफ्रॉम होमच्या नावाखाली लाखो रूपयांची फसवणुक



## पोलिसांच्या तप्तरतेने रक्कम परत

**काशिमीरा, प्रतिनिधी**

वर्कफ्रॉम होम नावाखाली ऑनलाईन यु टुबव्हि डीओ लाईक टास्क ऑनलाईन हॉटेल / मुव्ही रेटींगमध्ये गुतंवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीतील एकुण रक्कम ७,००,०००/- रुपये तक्रारदार यांना परत करण्यात काशिमीरा पोलीस ठाण्यास यश. अधिक माहीतीनुसार श्रीमती. जिगना मेहता, वय ४७ वर्ष मिरा- भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस स्टेशन परीसरात राहणाऱ्या यांची वर्कफ्रॉम होम नावाखाली ऑनलाईन यु टुब व्हीडीओ लाईक टास्क, ऑनलाईन हॉटेल / मुव्ही रेटींग यांना लाईक अथवा गुंतवणुक केल्यास अधिक नफामिळविण्याचे आमिष दाखवुन फियार्दी यांची ७,००,०००/- रूपयाची फसवणुक झाली होती.





सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनीयम कलम ६६ (सी), ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. या तक्रारी बाबत तात्काळ गुन्हा दाखल करुन घेवून काशिमीरा पोलीस यांनी तक्रारदार यांचे झालेल्या व्यवहाराबाबत महिती प्राप्त केली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात फिरवली असल्याचे पोलीसांच्या निदर्शनास आल्याने त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठिवल्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठिवण्यात आली. त्यानंतर मा. न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळिवण्या करीता काशिमीरा पोलीस ठाणेचे अधिकारी / अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम ७,००,०००/- रुपये त्यांच्या खात्यावर परतमिळिवण्यात आली आहे.

सदरची कामिगरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त पिर. ०१, मिरा रोड, श्री. विजय कुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मागर्दशनार्खाली श्री. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीसनिरीक्षक श्री. राहुल सोनवणे, पोउपनि निखील चव्हाण, पो हवा / ०६२०६ दिनेश आहेर यांनी पार पाडली आहे.

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

टेलिग्राम चॅनल, फेसबुक, इन्सटाग्राम अथवा व्हॉट्सअप वर जास्त परतावा देणाऱ्या प्रमोशनल जाहिरातींवर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.

- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये टेलिग्राम चॅनल, फेसबुक, इन्सटाग्राम वर जाहिरात करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे स्क्रीनशॉर्ट दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी काही लोकांचे बँक स्टेटमेंट मध्ये त्यांना फायदा झालेली रक्कम दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुक दारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुक दारांना जास्त व खात्रिशीर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.



- वर्कफ्रॉम होन, ऑनलाईन युट्यूब व्हीडिओ लाईक टास्क, हॉटेल मुव्ही रेटींग सारख्या गुंतवणुक करणाऱ्या बनावट जाहिरातींना बळी पडू नये.
- कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिकंवर क्लिक करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-वरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्या सोबत घडला असण्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

- सायबर फसवणुक हेल्प लाईन क्रमांक - १९३०
- सायबर फसवणुक हेलपलाईन वेबसाईहट - www.cybercrime.gov.in

# व्यावसायिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## फॉरेन करन्सी एक्स्चेंज व्यावसायिकाची केली होती २५ हजार डॉलर्सची फसवणूक

**मुंबई , प्रतिनिधी**

फिल्म लाइनच्या व्यवसायात असल्याची बतावणी करत फॉरेन करन्सी एक्स्चेंज व्यावसायिकाकडून २५ हजार अमेरिकन (यूएस) डॉलर्स घेऊन त्यांची फसवणूक करणाऱ्या परराज्यातील टोळीचा गुन्हे शाखेच्या कक्ष-८ने पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखेने माजिद खान ऊर्फ मन्नू (४४), मयंक शर्मा ऊर्फ लड्डू (२२) आणि आकाश अग्रवाल ऊर्फ कबीर ऊर्फ कब्बू (१९) यांना बेड्या ठोकल्या असून मुख्य सूत्रधार कृष्णन याचा पोलीस शोध घेत आहेत.



विलेपार्ले पूर्वेकडील चित्तरंजन रोड परिसरात राहात असलेल्या ४४ वर्षीय तक्रारदार यांचा विदेशी चलन बदलून देण्याचा (फॉरेन करन्सी एक्स्चेंज) व्यवसाय आहे. दिल्लीमधील ट्रॅव्हलिंग व्यावसायिकाने त्याच्या ओळखीच्या गौरव गोस्वामी नावाच्या दिल्ली येथे टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला फॉरेन करन्सी एक्स्चेंजसंदर्भात मदत पाहिजे असल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी गोस्वामीशी संपर्क साधला असता त्याने एका मोठ्या व्यक्तीला २५ हजार यूएस डॉलरची आवश्यकता असून तो सांताक्रुझमधील हॉटेल ग्रँड हयातमध्ये येणार असल्याचे सांगत कृष्णन नावाच्या व्यक्तीचा मोबाईल नंबर त्यांना पाठवला.

**टोळीने मुंबई आणि अन्य शहरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये व्यावसायिकांना बोलावून घेऊन अशाप्रकारे फसवल्याचे समोर आले आहे. यात २५ जानेवारीला आरोपींनी फॉरेक्स ट्रेडिंग करणाऱ्या व्यावसायिकाची ३० लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.**

गोस्वामीच्या बोलण्यावर विश्वास ठेवत तक्रारदार हे २७ फेब्रुवारीला पत्नीसोबत यूएस डॉलर्स घेऊन कृष्णन याला भेटण्यासाठी हॉटेल ग्रँड हयातमध्ये गेले. हॉटेलच्या चौथ्या मजल्यावरील खोलीमध्ये कृष्णन नाव सांगणारा व्यक्ती त्यांना भेटला. त्याने फिल्म लाईन व्यवसायात आल्याचे सांगत हॉटेलच्या लॉबीमध्ये अभिनेता अक्षय कुमार याची शूटिंग चालू असल्याने येथे भेटायला बोलावल्याची बतावणी केली. पुढे त्याने तक्रारदार यांना बोलण्यात गुंतवून २५ हजार यूएस डॉलर्स घेत तेथून पळ काढला. सर्वत्र शोध घेऊनही कृष्णन न सापडल्याने तक्रारदारांनी वाकोला पोलीस ठाणे गाठून फसवणुकीची तक्रार दिली.गुन्हे शाखेच्या कक्ष ८चे प्रमुख प्रभारी पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे यांच्या पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. व्यावसायिकांची फसवणूक करणारी टोळी यामागे असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेने उत्तर प्रदेशमधील रहिवासी खान याच्यासह दिल्लीतील रहिवासी शर्मा आणि अग्रवाल यांना अटक केली. तर, आरोपी कृष्णनचा शोध सुरू आहे.

# सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## १६ किलोपेक्षा जास्त सोने ▮ २.६५ कोटींची रोकड जप्त

**मुंबई , प्रतिनिधी**

महसूल गुप्तचर संचालनालयाने सोन्याची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईमध्ये अधिकाऱ्यांनी १६ किलोपेक्षा जास्त सोने आणि २.६५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली आहे. सोन्याची तस्करी करून त्याची बाजारात विक्री होत असल्याच्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी तस्करी केलेले १०.४८ कोटी रुपयांचे एकूण १६.४७ किलो, तस्करी केलेल्या सोन्याच्या विक्रीतून मिळालेली चांदी आणि २.६५ कोटी रुपये रोख रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे. टोळी प्रमुखासह एकूण ६ व्यक्तींना अटक करण्यात आली असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

तस्करी करून आणलेल्या सोन्याची खरेदी-विक्री करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या जागेची अधिकाऱ्यांनी अधिक्रायनी तपासणी केली. यावेळी तेथे परदेशी बनावटीचे मुख्यतः विटांच्या स्वरूपातील १०.७ किलो सोने तसेच सोने तस्करीच्या विक्री व्यवहारांतून मिळवलेली १.८ कोटी रुपयांची रोख रक्कम असा मुद्देमाल अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतला.



धाडीदरम्यान अधिकाऱ्यांनी या टोळीतील दोन जणांना ताब्यात घेतले. यापैकी एक जण ही टोळी चालवत असल्याचे निदर्शनास येताच त्याच्या घरी टाकलेल्या धाडीत तस्करी करून आणलेले ३.७७ किलो सोने ताब्यात घेण्यात आले. मिळालेल्या अधिक माहितीवरून ५ मार्च रोजी टोळीच्या प्रमुखाच्या घरी शोधमोहीम राबवण्यासाठी एक पथक नियुक्त करण्यात आले. पथकातील अधिकाऱ्यांना पाहून त्या माणसाने १४ व्या मजल्यावरील त्याच्या निवासस्थानातून संशयास्पद वस्तू फेकून दिल्या. अधिकाऱ्यांनी या परिसरातून ६० लाख रुपयांची रोकड हस्तगत केली. चौकशीदरम्यान टोळी प्रमुखाने आपला फोन आणि परदेशी बनावटीच्या सोन्याच्या दोन विटा फेकून दिल्याचे सांगितले. सुमारे १५ तास शोधमोहीम आणि पाठपुरावा केल्यानंतर ६ मार्च रोजी टोळी प्रमुखाच्या सोसायटीला लागून असलेल्या दोन सोसायट्यांमधील दोन रहिवाशांकडून टोळी प्रमुखाच्या मालकीचे ३ मोबाईल फोन आणि प्रत्येकी १ किलो वजनाच्या २ सोन्याच्या विटा ताब्यात घेतल्या. या रहिवाशांना तपासणीच्या रात्री योगायोगाने या वस्तू मिळाल्या होत्या आणि त्यांनी त्या स्वतःजवळच ठेवल्या होत्या. या प्रमुखाची पत्नीदेखील या टोळीची सक्रिय सदस्य आहे आणि ती कारमधून पळून जात आहे, अशी माहिती मिळाल्यावर तिला अडवण्यासाठी पथक तैनात करण्यात आले. सहा तासांच्या पाठलाग केल्यानंतर तिची धरपकड करण्यात आली. पकडल्यानंतर सोने विक्री व्यवहारांतून मिळालेली चांदी आणि रोख रक्कम ठेवलेली तिजोरी तिच्या फार्महाऊसवर असलेल्या मदतनीसाच्या घरी ठेवल्याची कबुली तिने दिली. मदतनीसाच्या घरी धाड टाकून ६ किलो सोने आणि २५ लाख रुपयांची रोकड ताब्यात घेण्यात आली. या प्रकरणी तस्करी केलेले १०.४८ कोटी रुपयांचे एकूण १६.४७ किलो, तस्करी केलेल्या सोन्याच्या विक्रीतून मिळालेली चांदी आणि २.६५ कोटी रुपये रोख रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे.

# गुजरातमधून आणलेला ३० लाखांचा गुटखा पकडला

**कल्याण , प्रतिनिधी**

गुजरात, वापी येथून चोरट्या मार्गाने आणलेला ३० लाख रुपयांचा प्रतिबंधित गुटख्याचा साठा कल्याणमधील दुर्गाडी किल्ला येथे खडकपाडा पोलिसांनी जप्त केला आहे. गुटखा घेऊन येणाऱ्या मोहम्मद राजा मोनीस पठाण (२६) या ट्रकचालकाला पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणातील मुख्य फरार आरोपी विनोद गंगवाणी याचा पोलीस शोध घेत आहेत.

कल्याणमधील दुर्गाडी परिसरात गस्त घालत असताना गुरुवारी दुपारी खडकपाडा पोलिसांना दुर्गाडी किल्ला येथून एक ट्रकचालक भरधाव वेगात



संशयास्पदरीत्या ट्रक चालवत असल्याचे आढळले. पोलिसांनी पाठलाग करून ट्रक रोखून धरला. ट्रकमध्ये काय आहे याची माहिती विचारली असता ट्रकचालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांनी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त बोलावून ट्रकची तपासणी केली असता त्यात प्रतिबंधित गुटख्याचा साठा आढळला. १० गोण्यांमध्ये विमल पान मसाला तसेच तंबाखू जर्दा असा एकूण ट्रकसह ३० लाखांचा साठा पोलिसांनी यावेळी जप्त केला. हा गुटखा उल्हासनगर परिसरात नेऊन तेथून त्याची घाऊक पद्धतीने विक्री करण्याचा तस्करांचा उद्देश असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अनिल वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ए. ए. शिवले, सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल गायकवाड, ए. एम. जाधव या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# बनावट देशी दारूच्या ४८ हजार बाटल्या जप्त

## उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**कल्याण , प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने कल्याणमध्ये बनावट देशी दारूच्या ४८ हजार बाटल्या जप्त केल्या आहेत. बनावट देशी दारूची वाहतूक करणाऱ्या साईनाथ रामगिरवार, अमरदीप फुलझेले या दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या बाटल्यांवर नगर जिल्ह्यातील देशी दारू बनवणाऱ्या एका नामांकित कंपनीचे लेबल लावण्यात आले होते. कल्याण-मुरबाड रोडवरून येणाऱ्या एका ट्रकमध्ये बनावट



दारूचा साठा असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे उत्पादन शुल्क विभागाच्या कल्याण विभागाने कल्याण-मुरबाड रोड परिसरात सापळा रचला. सुभाष चौक परिसरात हा ट्रक दिसताच उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांनी हा ट्रक थांबवला. तपासणी केली असता ट्रकमध्ये बनावट देशी दारूचा साठा आढळून आला. ४८ हजार ४०० बाटल्या या ट्रकमध्ये होत्या. याप्रकरणी उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने ट्रकमधील साईनाथ रामगिरवार, अमरदीप फुलझेले या दोघांना ताब्यात घेतले असून बनावट देशी दारूचा साठादेखील जप्त केला. या दारूच्या बाटल्यांवर नगर जिल्ह्यातील एका नामांकित कंपनीचे लेबल लावण्यात आले होते. हा साठा या दोघांनी कुठून आणला होता व कुठे घेऊन जाणार होते, कुणाला विक्री करणार होते याचा शोध आता उत्पादन शुल्क विभाग करत आहे.

# कारवाईची भीती घालत महिलेला दोन लाखांना गंडा

**मुंबई, प्रतिनिधी**

कुरिअर कंपनीतून बोलत असल्याची बतावणी करीत नावावर बुक केलेल्या पार्सलमध्ये ड्रग्ज, पासपोर्ट, क्रेडिट कार्ड सापडल्याने गुन्हा दाखल झाल्याची बतावणी करून कारवाईची भीती घालत ठगांनी एका महिलेला दोन लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करून शिवाजी पार्क पोलीस अधिक तपास करीत आहेत.

दादर पश्चिमेकडील गोखले रोड परिसरात राहात असलेल्या ४७ वर्षीय अमृता या गृहिणी आहेत. ६ मार्चच्या दुपारी त्यांना अनोळखी मोबाईल नंबरवरून कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने अमृता यांना 'तुमचे पार्सल रिजेक्ट केले आहे,' असे सांगत एक नंबर डायल करण्यास सांगितले. अमृता यांनी तो नंबर डायल करताच त्यांचा कॉल शुभम गुप्ता नावाच्या व्यक्तीशी जोडला गेला.शुभमने तो फेडेक्स कुरिअर कंपनीतून बोलत असल्याची बतावणी करत पार्सल कार्ड नावाने नंबर देत तुमच्या मोबाईल नंबर आणि नावाचा गैरवापर करून पाच पासपोर्ट, तीन बँक क्रेडिट कार्ड, २० ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज, एक लॅपटॉप, ४.३ किलोग्रॅम क्लोथ, पेअर शूज असे पार्सल तैवान येथून झ्याग नावाच्या कोणी तरी तुमच्या नावाने आयसीआय क्रेडिट कार्ड नंबर आणि १५ हजार ६२५ रुपये देऊन पाठवल्याची बतावणी केली. पार्सलमध्ये ड्रग्ज असल्याने आम्ही पोलीस सायबर क्राईमला कनेक्ट करतो, असे सांगत अन्य एका मोबाईल क्रमांकावर अमृता यांचा कॉल कनेक्ट केला. थोडे बोलणे झाल्यावर हा कॉल डिसकनेक्ट झाला. मात्र तोपर्यंत अमृता घाबरल्या होत्या. पुढे त्यांना स्कॉईप अॅप डाऊनलोड करण्यास भाग पाडून स्कॉईपवर सायबर क्राईम मुंबई सर्च करून त्यावर व्हिडीओ कॉल करण्यास सांगितले गेले. अमृता यांनी व्हिडीओ कॉल करताच त्यांच्या बँक खात्यातून १.६ मिलियनचे मनी लाँडरिंग झाले आहे. तसेच त्यांचे नाव हुमन ट्राफिकिंग आल्याचे सांगून आणखी घाबरवण्यात आले. आरोपींनी अमृता यांना त्यांच्या नावाचे एफआर लॉन्च केल्याचा फोटो पाठवून तुम्ही यात अडकला आहात, तुम्हाला अटक होईल, असे सांगून बँक खात्यातील रक्कम सुरक्षित ठेवण्याच्या बहाण्याने खात्यातील २ लाख ८ हजार ५०० रुपयांवर हातसाफ केला. अमृता यांच्या बँक खात्यातील रक्कम आरोपींनी सायबर ब्रँचच्या सर्व्हेलन्स अकाऊंटवर जमा करतो, असे सांगून जय महाकाली ट्रेडर्सच्या खात्यावर वळती करून घेतली होती. कॉल बंद करून काही काळ वाट बघितल्यानंतर अमृता यांनी त्यांना आलेल्या मोबाईल नंबरवर कॉल केला असता तो कॉल कर्नाटकमधील गावात लागला. त्यानंतर अमृता यांनी फेडेक्स कुरिअर कंपनीच्या टोलफ्री नंबर कॉल करून घडलेला प्रकार सांगितला असता त्यांनी फसवणूक झाल्याचे सांगितले. अखेर अमृता यांनी शिवाजी पार्क पोलीस ठाणे गाठून सायबर फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# पत्नीबद्दल अपशब्द वापरल्याने मित्राची निर्घृण हत्या

**मुंबई , प्रतिनिधी**

दारू प्यायल्यानंतर पत्नीबद्दल अपशब्द वापरल्याने एका मासे विक्रेत्याने धारदार शस्त्राने वार करून मित्राची निर्घृणपणे हत्या केल्याची घटना शुक्रवारी पहाटे चेंबूरमध्ये घडली. याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करन टिळकनगर पोलिसांनी आरोपी रोहित दीपक खर्पे (२९) याला बेड्या ठोकल्या आहेत.

चेंबूरच्या टी. वाय. थोरात मार्गावरील तंबी ब्रिजखाली एक तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती शुक्रवारी पहाटे सव्वाचारच्या सुमारास मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाला मिळाली. घटनेची वर्दी मिळताच टिळकनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी अवस्थेतील तरुणाला उपचारांसाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला दाखलपूर्व मृत घोषित केले. घटनेची नोंद करून टिळकनगर पोलिसांनी तपास सुरू केला. मृत तरुण हा नवी मुंबईतील सानपाडा परिसरात राहात असलेला भीमसेन देवचंद भालेराव (३५) असल्याचे उघड झाले. भालेराव हा गुरुवारी रात्री चेंबूरमध्ये आला होता. तो खर्पेसोबत दारू प्यायला बसला. या वेळी त्याने खर्पेच्या पत्नीबद्दल अपशब्द काढले. यामुळे खर्पे याने रागाच्या भरात धारदार शस्त्राने भालेराववर सपासप वार करून पळ काढल्याचे पोलीस तपासात समोर आले.

# फेसबुकवरील मैत्री महिलेला पडली महागात

## सायबर चोरट्यांनी घातला ३ लाखांना गंडा

**नवी मुंबई , प्रतिनिधी**

फेसबुकवरून एका अनोळखी व्यक्तीसोबत मैत्री करणे नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका ४४ वर्षीय महिलेला चांगलेच महागात पडले आहे. या महिलेने ज्या अनोळखी व्यक्तीसोबत फेसबुकवरून मैत्री केली, त्या व्यक्तीने या महिलेला कॅनडा येथून १० हजार डॉलर, सोन्याची चेन, आय फोन, डायमंड वॉच, लेडीज पर्सचे गिफ्ट पार्सल पाठवल्याचे सांगून हे पार्सल कस्टमच्या तावडीतून सोडवण्याच्या बहाण्याने तिला वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये ३ लाख ८ हजार रुपये पाठवण्यास भाग पाडून तिची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर गुन्हेगारांच्या टोळीविरोधात फसवणुकीसह



आयटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

या घटनेतील तक्रारदार महिला प्रतीक्षा (४४) या नवीन पनवेलमध्ये कुटुंबासह राहण्यास असून त्या एका खासगी कंपनीमध्ये कामाला आहेत. एप्रिल २०२३ मध्ये एका सायबर चोरट्याने प्रतीक्षा यांच्या फेसबुकवर मि. इलोट नावाने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून त्यांच्यासोबत मैत्री केली होती. त्यानंतर भामट्या इलोट याने चॅटिंगद्वारे व व्हॉट्सअॅपवरून बोलणे करून खास मैत्री झाल्याचे भासवले. त्यानंतर इलोट याने १० हजार डॉलर, सोन्याची चेन, आयफोन-१३, लेडीज पर्स, महागडी डायमंड असलेली वॉच पाठवल्याचे प्रतीक्षा यांना सांगितले. मात्र हे पार्सल एअरपोर्टमध्ये तपासणीदरम्यान पकडण्यात आले असून हे पार्सल सोडवण्यासाठी ४१ हजार रुपये मनी लॉडरिंग चार्जेस भरावे लागतील असे सांगितले. त्यामुळे प्रतीक्षा यांनी आपल्या खात्यातून ही रक्कम पाठवून दिली. काही दिवसांनंतर डिलिव्हरी बॉय असल्याचे भासवून दुसऱ्या सायबर चोरट्याने सदरचे पार्सल सोडवण्यासाठी प्रतीक्षा यांना आणखी मनी लॉडरिंगची रक्कम पाठवण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने या सायबर चोरट्यांनी वेगवेगळी कारणे सांगून प्रतीक्षा यांच्याकडून एप्रिल ते डिसेंबर २०२३ या कालावधीत ३ लाख ८ हजार रुपये उकळले. इतकी रक्कम पाठवल्यानंतर देखील प्रतीक्षा यांना त्यांचे पार्सल मिळाले नाही, त्यामुळे त्यांनी इलोट याने पाठवलेले पार्सल नाकारून आपली रक्कम परत देण्यास सांगितले. त्यानंतर त्याने वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ केली. त्यानंतर आपली फसवणूक होत असल्याचे प्रतीक्षा यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# 'शिकारी'च्या शोधात पोलीस पथके कोलकाता-काश्मीरमध्ये दाखल

## वडाळा अपहरण हत्या प्रकरण

**मुंबई , प्रतिनिधी**

वडाळ्यातील १२ वर्षीय शाळकरी मुलाचे महिनाभरापूर्वी अपहरण करून शीर धडापासून वेगळे करत निर्घृणपणे हत्या केल्याच्या प्रकरणातील संशयित आरोपी बिपूल शिकारीच्या शोधासाठी पोलीस पथके काश्मीर आणि कोलकाता येथे पोहोचली आहेत. एकीकडे पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असताना मृत मुलाच्या कुटुंबीयांनी कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे वडाळा परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वडाळा पूर्वेकडील शांतीनगर परिसरात कुटुंबासोबत राहत असलेल्या १२ वर्षीय मुलाला आरोपी शिकारी याने २८ जानेवारीच्या रात्री हॉटेलमध्ये जेवायला नेतो, असे सांगून आपल्यासोबत नेले. त्यानंतर सोमवार, ४ मार्चला या मुलाचे कुजलेल्या अवस्थेतील धड आणि मंगळवारी शीर शांतीनगर जवळील खाडी पट्ट्यात सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. अपहरण झालेल्या मुलाचा मृतदेह दोन तुकड्यांमध्ये सापडल्याने पोलीस खडबडून जागे झाले असून आरोपीच्या शोधासाठी जंगजंग पछाडू लागले आहेत.

मूळचा कोलकाता येथील रहिवासी असलेल्या आरोपी शिकारी विरोधात हत्येचा गुन्हा दाखल होता. गुन्ह्यात पॅरोलवर बाहेर पडल्यानंतर तो मुंबईत पळून आला होता. मात्र तो पोलिसांना सापडला नाही. त्यात या मुलाच्या हत्येनंतर गेला महिनाभर तो पोलिसांना गुंगारा देत आहे. मुलाला तृतीयपंथीयाला विकल्याचे त्याने स्थानिकांना सांगितले होते. त्यानुसार, पोलिसांनी तृतीयपंथीयांची चौकशी केली. मात्र या चौकशीमधून काही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे आरोपी शिकारी याने मुलाला तृतीयपंथीयाला विकल्याचे खोटे सांगितल्याचा संशय पोलिसांना आहे.



**फिरायला जातो, असे सांगून घराबाहेर पडलेला मुलगा घरी परतलाच नाही. सर्वत्र शोध घेऊनही तो न सापडल्याने मुलाच्या वडिलांनी वडाळा टीटी पोलीस ठाणे गाठून मुलगा हरवल्याची तक्रार दिली होती. तसेच मुलगा याच परिसरात राहत असलेल्या आरोपी शिकारी याच्यासोबत गेल्याचे समजल्याने स्थानिकांनी शिकारी याला पकडून चोप देत पोलिसांच्या हवाली केले होते. मात्र पोलिसांना चकवा देऊन तो पसार झाला. त्यानंतर पोलीस मुलाचा आणि आरोपी शिकारी याचा शोध घेण्यात अपयशी ठरल्याने मुलाच्या कुटुंबीयांसह स्थानिकांनी संबंधित पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार या प्रकरणाची सहाय्यक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.**

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १२ मार्च ते १८ मार्च २०२४

# संपादकीय

## हळूहळू बदल घडत आहेत



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

'कुणाचा भरोसा द्यावा असे कुणी उरलेच नाही' ही कुठल्याशा गझलमधील एक पंक्ती आजच्या इतकी खरी कधी वाटली नव्हती. माणसांचे सोडा, प्राणीमात्रातील ही एक जात अत्यंत बिनभरवशाची हे सर्वांनीच मान्य केलेले आहे. त्यासाठी वेगळे काही पुरावे शोधायला दूर कुठे जाण्याचीही आवश्यकता नाही. डोळ्यांवरील विचारसरण्यांचे, श्रद्धा आणि भावभक्तीचे पडदे दूर करून आजूबाजूस पाहिले तरी त्याची प्रचिती येईल. एकंदर काळच फसवा. पण, दुःख याचे की आताशा ऋतूही बेभरवशाचे झाले आहेत. ज्यांनी शाळकरी वयात इतिहास-भूगोलाचा अभ्यास केलेला असेल, त्यांना हे पक्के माहीत असते, की आपल्याकडे ऋतू तीन. हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा. त्यांचा-त्यांचा एक ठरलेला काळ. त्या महिन्यांत त्यांनी नेमाने यावे आणि जावे. ऋतुमानाचे चक्र सुरू राहावे. पण, हल्ली ते ऋतुही चळले. वर्षाऋतु तसा नको तेव्हा गोंधळ घालण्यासाठी प्रसिद्ध. इतका की, इंदिरा संतांसारख्या थोर कवयित्रीनेही 'नको नको रे पावसा असा अवेळी धिंगाणा' असे विनवून ठेवले आहे. पण, गत काही वर्षांत त्याचे ते अवेळी बरसणेच वाढले. जेव्हा हवा तेव्हा यायचे नाही आणि नको असेल तेव्हा धो धो बरसायचे. ते का, हे कोणास काही समजेना. वाटले, हा नवाच ऋतू. लोकांनी त्याचे नामकरणही केले - हिवसाळा. हिवाळ्यातला पावसाळा. सवय झाली त्याची. पण, आता त्या हिवाळ्यानेही ताळ सोडला आहे. त्याने अंग आक्रसून घेतले. त्यावर उन्हाळ्याचे आक्रमण झाले. फेब्रुवारी म्हणजे गुलाबी थंडीचा, हुरडा पार्ट्यांचा, हरभऱ्याच्या हुळ्यावर ताव मारण्याचा महिना. पण यंदा या महिन्यातच उन्हाळा अवतरला. त्यात भर म्हणून पावसाळा. एक वेगळाच कॉकटेली ऋतू तयार झाला. भावाची किमान हमी द्यावी म्हणून मायबाप सरकारकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाला आता ऋतूंकडे किमान हमी मागण्याची वेळ आली आहे, की बाबा, जे काही करायचे ते तुझ्या दायऱ्यात कर. इकडे-तिकडे घसरू नको. असे ऋतूंनीच ताळतंत्र सोडले, तर त्या काळ्या मातीने पिकवायचे तरी काय आणि कसे?

ही परिस्थिती का आली आणि कशी आली हा मोठाच अभ्यासाचा विषय. आपल्या हवामानशास्त्रज्ञांना पुसाल, तर ते नैऋत्य मोसमी वारे आणि अरबी समुद्रातील कमी दाबाचा पट्टा आणि वेस्टर्न डिस्टर्बन्स असे काय काय सांगतील. तिकडे हवामान बदलाच्या आणि पर्यावरणाच्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सतत चर्चा, ती वैश्विक तापमानवाढीची. पृथ्वीचे तापमान वाढले आहे. त्यामुळे ऋतू चळले, दुष्काळ-मग ते ओले असोत की सुके-वाढले हे खरेच आहे. पण, त्यावर इलाज कोण करणार? तापमान वाढले तर ते कमी कसे करणार? ते औद्योगिकीकरणपूर्व काळातील तापमानाच्या दीड अंश सेल्सिअसपर्यंत न्यायला हवे यावर सगळ्यांचेच एकमत आहे. ते तसे न नेल्यास आपल्या सर्वांचेच काय हाल होतील याची काळीकुट्ट चित्रे तर गेल्या कित्येक वर्षांपासून रंगवण्यात येत आहेत. त्या चित्रांमुळे 'ग्रीन', 'हरित' हा एक परवलीचा शब्द बनून गेला आहे. तशी शब्दसेवा करण्यात आपण सारेच पटाईत. धूसर धूसर घोषणांचे असे काही धुके उभे करायचे की माणसाचा मेंदूच बधीर झाला पाहिजे. तर हवामान बदलाच्या संदर्भात सगळ्याच राष्ट्रांत तसे चालले आहे. सर्वांनीच कार्बन उत्सर्जन कमी करावे असा एक शहाणपणाचा सल्ला सगळेच देत आहेत, पण तो पाळणार कोण आणि कसा? तेथेही गरीब आणि विकसनशील देशांनाच दडपण्याचे काम सुरू. माणसे अशी एकमेकांशी लढत असताना आणि उपायांवरच शाब्दिक खेळ खेळत असताना ऋतूंचे चळणे मात्र थांबलेले नाही. यंदाचा फेब्रुवारी हा आतापर्यंतचा सर्वात उष्ण फेब्रुवारी ठरलेला आहे. तिकडे जपानपासून मेक्सिकोपर्यंत आताच वसंताने आपली रंगीबिरंगी द्वाही दिलेली आहे. या महिन्यात बर्फावरचा खेळ हे युरोपातील अनेकांच्या उत्पन्नाचे साधन, पण हिवाळ्यात उन्हाळा घुसला. बर्फ वितळू लागला आणि त्या व्यवसायाचा फज्जा उडाला. केवळ शेतीच नव्हे, तर अशी अनेक क्षेत्रे या हवामान बदलाने बाधीत झाली आहेत. अर्जेंटिना, पेरू, ब्राझील, चिलीमध्ये याच महिन्यात उष्मालाट आली आणि तिने किमान सव्वाशे लोकांचा बळी घेतला. आपल्याकडेही आजार वाढले आहेत. त्याने अनेकांचे मासिक अंदाजपत्रक कोलमडले आहे. सामान्यांच्याच नव्हे, तर राष्ट्रांच्या अंदाजपत्रकासही झळ लावण्याची क्षमता या तापमानवाढीमध्ये आहे. शास्त्रज्ञ सावधगिरीचा इशारा देत आहेत. ते सांगत आहेत, की औद्योगिकीकरण पूर्व काळातील तापमानाच्या वर दीड अंश सेल्सियस ही मर्यादा आपण गाठली, तर भारतातील कृषीक्षेत्रातील दुष्काळ तब्बल २१ टक्क्यांनी कमी होईल. केवळ दुष्काळच नव्हे, तर नद्यांचे पूर आणि लोकसंख्येला बसणारी दुष्काळाची झळ यामुळे जे आर्थिक नुकसान होते तेही मोठ्या प्रमाणावर कमी होईल. दीड अंश सेल्सियस ही पॅरिस कराराने घालून दिलेली मर्यादा. ती ओलांडली, तर मात्र काही खरे नाही. अर्ध्याहून अधिक भारत दुष्काळाच्या मगरमिठीत सापडू शकेल.

आता एक सामान्य नागरिक म्हणून आपण काय करू शकतो? आपल्याला आपलेच भरपूर ताप, तेथे आपण कुठे जाणार वैश्विक तापमान कमी करायला? प्रश्न रास्त आहे. सामान्य माणूस एकटा काहीच करू शकत नाही. पण, या ऋतूबदलांचा खेळ मात्र त्या सामान्य माणसाच्या एकेकट्याच्या जीवावरच येत आहे. दुष्काळ, पूरस्थिती, पिकांचे नुकसान, पीक उत्पादनात घट, जैवविविधतेची नासाडी या साऱ्याच्या तापाचा अंतिम धनी तर तोच असतो. तेव्हा खारीचा वाटा तर उचलावाच लागेल. आपली स्वतःची कार्बन पदचिन्हे कमी करणे हे त्यातील पहिले पाऊल. आता ही पदचिन्हे कमी कशी करायची? तर ऊर्जास्नेही उपकरणे वापरायची, वाहनांचा वापर कमी करायचा, 'रिन्यूएबल एनर्जी'बाबत सरकार राबवत असलेल्या उपक्रमांत सहभागी व्हायचे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या लोकप्रतिनिधींना याबाबत साक्षर करायचे, त्यांच्यावर दबाव आणायचा. हळूहळू का होईना बदल घडत आहेत, त्यांना हातभार लावायचा. हे सारे करायचे ते जितके उद्याच्या पिढीसाठी, तितकेच ते आपल्या स्वतःसाठीही. अखेर हवामान बदल हे 'क्लिअर ॲण्ड प्रेझेन्ट डेंजर' आहे. ते जितके सुस्पष्ट आहे, तितकेच आजचे आहे.

# प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडाला

प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे, हे आपल्याला दिसतेच. अनेक ठिकाणी तर पेपर फोडण्याचा ठेका घेणारे लोक आहेत. परीक्षा केंद्रे आहेत. त्यावर बातम्या येतात, पण ज्यांनी त्याला आळा घालायचा, त्यांच्या लक्षात अशातले काहीच येत नाही की त्यांना पाहायचेच नसते, असा प्रश्न विचारणे शक्य आहे.

अमक्या परीक्षेचा पेपर फुटला, तमक्याचा फुटला, व्हॉट्सॲपवर व्हायरल झाला, कॉप्या सापडल्या, परीक्षा केंद्रावर धाड पडली. दशकानुदशके आपल्या परीक्षा व्यवस्थेत हा गोंधळ सुरू आहे. मेरिट लिस्ट छापणे बंद झाले, पण दहावी-बारावीचे महत्त्व कमी झाले नाही. त्यामुळे त्या परीक्षांचे पेपर फोडणे-फुटणे हे सुरूच आहे. दहावीचा मायबोली मराठीचा पेपरदेखील आपल्या विक्रमादित्य मंडळींनी फोडला. अशा प्रकरणांत तात्पुरती कारवाई होते. पण, एखाद्या प्रकरणात सखोल चौकशी झाली आणि अशा फोडाफोडीच्या मागे असलेल्या सूत्रधारांचा शोध लागला, असे घडल्याचे ऐकिवात आले नाही. वाचण्यातही आले नाही. आपल्या भारतीय मानसिकतेत नियमभंगाचे थ्रिल हा एक वेगळाच भाग आहे. नियम मोडण्यात आपल्यापैकी अनेकांना मोठेपणा वाटतो. इतर लोक (मूर्खासारखे किंवा बावळटासारखे) हिरवा सिग्नल मिळण्याची वाट पाहत चौकात आपले वाहन घेऊन थांबले असताना एखादा शहाणा सुळकन् आपली मोटारसायकल घेऊन नागमोडी वळणांसह निघून जातो. इतरांच्या दृष्टीने तो शहाणाच असतो. रस्त्यावर उभ्या असलेल्या कायद्यालादेखील अशा बहाद्दरांना थांबवावेसे वाटत नाही. तेच कॉपी करणे किंवा पेपर फोडणे या प्रकाराबद्दल अनेकदा होताना दिसते. पेपर फोडणाऱ्यांचे कौतुक होते. ग्रामीण भागात नव्हे तर शहरी भागांतही हा प्रकार आहे. पेपर कुठेही फुटू शकतो, फुटतो. अशा घटनांची कारणे आपल्या शिक्षण व्यवस्थेतील कमकुवतपणात तसेच शैक्षणिक दर्जाबद्दलच्या आपल्या चुकीच्या कल्पना यात दडली आहे.

पेपर फोडण्याची प्रथा केवळ परीक्षा प्रक्रियेच्या विश्वासार्हतेला धक्का देणारी आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे मोल कमी करणारी आहे. प्रश्नपत्रिका फुटणे ही दहावी-बारावीच्या स्तरावरील एक समस्या बनली आहे. व्यावसायिक परीक्षांचेही पेपर फोडले जातात, फुटतात. पेपर जे काढतात, जे सांभाळतात, जे पोहोचवितात आणि जे वितरित करतात ती यंत्रणा निश्चित असते. त्यामुळे या यंत्रणेत कच्चे दुवे असल्याखेरीज पेपर फुटू शकत नाही. हे झारीतले शुक्राचार्य कोण, हे शोधणे कठीण नाही. पण, तसे होताना दिसत नाही. अशांचा शोध क्वचितच लागतो, बहुतेकदा लागतच नाही. परंतु, या समस्येचे परिणाम अतिशय वाईट आहेत, हे आपण समजून घेतले पाहिजे. प्रश्नपत्रिका फुटल्याचे परिणाम परीक्षा हॉलच्या पलीकडेही जाणवतात. जे विद्यार्थी परीक्षेची परिश्रमपूर्वक तयारी करतात, प्रश्नपत्रिका फुटल्याने लाभान्वित झालेल्यांशी स्पर्धा करावी लागणे हा सर्वांत मोठा अन्याय आहे. यातून आपण शिक्षणाच्या एकूणच गुणवत्तेला नख लावतो आहोत, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.



हा प्रकार रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या गेल्या खऱ्या. प्रश्नपत्रिका फुटण्याचे प्रकार रोखण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्राथमिक पद्धतींपैकी एक म्हणजे सीलबंद लिफाफे, पर्यवेक्षणाचे (सुपरव्हिजन) अनेक स्तर आणि प्रश्नपत्रिकेच्या हाताळणीसाठी सुनिश्चित व्यक्ती व्यवस्था. हे उपाय भूतकाळात प्रभावी ठरले असले तरी नव्या काळात या पद्धतीने हा प्रश्न हाताळला जाऊ शकत नाही. कारण एखाद्याने पेपरचा फोटो काढून व्हॉट्सॲपवरून कुणाला तरी पाठविणे हे काम अवघ्या पाच-सात सेकंदात होण्यासारखे आहे. आता फिजिकली पेपर फोडणे आवश्यक नाही, त्याची झेरॉक्स काढण्याची गरज नाही. आता फक्त फोटो काढायचा आणि तो पाठवून द्यायचा एवढेच करावे लागते आणि जबाबदार लोकांच्या साखळीतील कोणताही बदमाश माणूस ते करू शकतो. त्यामुळे या साखळीत किंवा या व्यवस्थेत ज्यांना काम करायचे आहे, त्यांचे चारित्र्य व हेतू स्वच्छ आहे की नाही हे आधीच तपासून घेतले पाहिजे. दुसरे म्हणजे जबाबदारी निश्चित करणे व त्यानुसार कारवाई करणे. याशिवाय ज्या केंद्रावर पेपर फुटला, त्याची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याची तरतूद. ज्या पर्यवेक्षकाच्या देखरेखीत फुटला, त्याला कायमस्वरुपी या कामापासून दूर ठेवण्याची तरतूद अशा किती तरी गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. काही गोष्टी होतातही, पण हे सारे कठोरतेने केले पाहिजे. आपले विद्यार्थी आता नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत शिकणार आहेत. अभ्यासक्रमात नव्या काळाच्या दृष्टीने बरेच बदल होत आहेत. महत्त्वाचा बदल हा अशा प्रकारच्या वाईट गोष्टींना प्रतिरोध करण्याच्या दृष्टीने व्हायला हवा. शासन-प्रशासन आणि मूल्यांकन या प्रक्रियांमध्ये गोपनीयतेचा संबंध त्या प्रक्रियेच्या पावित्र्याशी असतो. पेपरच्या गोपनीयतेचा संबंध परीक्षेच्या पावित्र्याशी असतो, हे या प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्वांनी समजून घेतले पाहिजे. एकदा पेपर फोडणे, त्याचा लाभ मिळवणे किंवा मिळवून देणे यातून काही व्यक्तींचा फायदा होतो, पण दीर्घकाळात त्या समाजाचे, देशाचे नुकसान होते. परीक्षा व्यवस्थेबद्दल संशय निर्माण होतो. त्या सच्छिद्र व्यवस्थेचा फायदा घेणाऱ्यांची चलती पाहून प्रामाणिक लोकांनादेखील त्याच मार्गाने जावेसे वाटते. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार सर्वज्ञात आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये आणि व्यवस्थांमध्ये-यंत्रणांमध्ये नैतिकतेची संस्कृती आपण निर्माण करू शकलो नाही. केवळ टक्केवारी मिळवणे आणि उत्तम गुणांनी पास होणे यालाच महत्त्व आहे. ही टक्केवारी कोणत्या मार्गाने मिळाली, याचा फारसा विचार होत नाही.

# नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

## मुंबईत रेल्वे अधिकाऱ्याला सीबीआयकडून बेड्या

**मुंबई :** मध्य रेल्वेमध्ये नोकरी शोधणाऱ्या तरुणांना रेल्वेमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांच्या कडून पैसे घेत फसवणूक करणाऱ्या मध्य रेल्वेच्या मुख्य डेपो मटेरियल सुपरिटेंण्डंटला (सीडीएमएस) केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) बेड्या ठोकल्या. राजेश आर. नाईक असे अधिकाऱ्याचे नाव असून, सीबीआयच्या या कारवाईने रेल्वे विभागात एकच खळबळ उडाली आहे.





सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, यातील आरोपी नाईक हा मध्य रेल्वेच्या परळ वर्कशॉपमध्ये मुख्य डेपो मटेरियल सुपरिटेण्डंट (सीडीएमएस) पदावर कार्यरत असताना त्याने नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांना मध्य रेल्वेमध्ये विविध पदांवर नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली त्यांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. तरुणांची फसवणूक करण्यासाठी आरोपी नाईक याने डीपीओ, मध्य रेल्वे, मुंबई यांच्या नावाने बनावट नियुक्ती पत्रे, वैद्यकीय तपासणी पत्रे, प्रशिक्षण पत्रे पाठवून मोठ्या प्रमाणात तरुणांकडून पैसे उकळले. सीबीआयने दाखल केलेल्या गुन्ह्यातील, फिर्यादी यांना त्यांच्या दोन मुलांना मध्य रेल्वेत कनिष्ठ लिपिक पदावर नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत नाईकने सुरक्षा ठेव, वैद्यकीय तपासणी फी, प्रशिक्षण शुल्क, अभ्यासक्रम शुल्क अशा विविध शुल्कांच्या नावाखाली एकूण १० लाख ५७ हजार ४०० रुपये उकळले. फिर्यादी यांचा विश्वास बसावा म्हणून त्याने बनावट नियुक्ती पत्र आणि प्रशिक्षणाचे आदेश पत्र दिले होते. मात्र, मुलांना नोकरी मिळवून दिली नाही.फिर्यादी यांच्या तक्रारीवरून सीबीआयने या आरोपी नाईकसह अज्ञात लोकसेवक आणि खाजगी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासाअंती सीबीआयने मध्य रेल्वेच्या मुख्य डेपो मटेरियल सुपरिटेण्डंट नाईकला अटक करत त्याच्या घर, कार्यालयासह तीन ठिकाणी झडती घेतली. सीबीआयने आरोपी नाईकच्या घर, कार्यालयातून बनावट ऑफर लेटर, ट्रेनिंग ऑर्डर, बँक ट्रान्झॅक्शन पावत्या अशी कागदपत्रे जप्त केली आहेत. आरोपींनी २० हून अधिक तरुणांची फसवणूक केल्याचे दस्तावेज, पुरावे सीबीआयला सापडले असून, त्याआधारे सीबीआयकडून अधिक तपास सुरू आहे.


# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

**जावक क्र. वविशम /कवि/३९९/२०२३-२४**
**दि. ०६/०३/२०२४**

## जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संर्दभाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्रमांक. | पावती क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळींज-2 | NL02/550/3 | 6935 | नियाज अहमद बरकत अली शेख | मोहम्मद रफिक मोहम्मद युसुफ शेख |
| 2 | तुळींज-1 | NL01/134/28 | 6936 | रमेश एस. सिंग | राकेश मुकुंद मोरे व सानिका राकेश मोरे |
| 3 | तुळींज-2 | NL02/344/58 | 6939 | सुजय सुशिल झांझ | मनीषा रंजीत चौहान |
| 4 | तुळींज-2 | NL02/430/97 | 6941 | करामत अली शराफत अली सैय्यद | रेहाना परविन शकील अहमद अन्सारी |
| 5 | तुळींज-2 | NL02/210/15 | 6943 | महेंद्र बच्चन सिंग | भरत यशवंत घाणेकर व वैदेही भरत घाणेकर |
| 6 | तुळींज-2 | NL02/501/1 | 6946 | रतनकुमार राजाराम गुप्ता | क्रांती गणेश मुंडे |
| 7 | तुळींज-3 | NL03/44/1 | 6947 | प्रमोद पांडुरंग कदम | विनेश विठोबा गराटे |
| 8 | तुळींज-4 | NL04/149/24 | 6950 | राजाराम शु धारणे | सोनी शिवाजी गुप्ता |
| 9 | तुळींज-3 | NL03/776/107 | 6951 | सुभाष शांताराम गिडये | दत्ताराम दगडू भोपणे |
| 10 | तुळींज-3 | NL03/217/10 | 6954 | आत्माराम भगवान शेटकर | संदेश संतोष शिर्के |
| 11 | तुळींज-2 | NL02/955/10 | 6956 | .......... | मीना केतन ओश्रमकर |
| 12 | तुळींज-2 | NL02/431/36 | 6958 | सकिरअली कमरुद्दीन शेख | सय्यद अली |
| 13 | तुळींज-2 | NL02/659/27 | 6961 | सईदा अंसारी व मोहम्मद अहमद अंसारी | रुकय्या अब्दुल्लाह सुनसरा |
| 14 | तुळींज-7 | NL07/250/8 | 6963 | ग्रेस मोजेस रिबेरो | सुनिता भोलानाथ कनोजिया |
| 15 | तुळींज-2 | NL02/703/38 | 6964 | शब्बीर मोहम्मद कडीवाला | ईमरानभाई मो. हुसेन शेलिया व ईमरानाबेन ईमरान शेलिया |
| 16 | तुळींज-7 | NL07/15/4 | 6967 | इब्राहिम बशीर खान | दिलीप शिवप्रसाद गुप्ता व बेबी गुप्ता |
| 17 | तुळींज-2 | NL02/774/61 | 6968 | अजय गोनौर बैठा | बीरबल अच्छेलाल गुप्ता व बबितादेवी बीरबल गुप्ता |
| 18 | तुळींज-3 | NL03/643/16 | 6972 | बिरजु धनेश साव | पलानी अंमल रामा |
| 19 | तुळींज-3 | NL03/1147/16 | 6976 | प्रकाश लक्ष्मण जालगावकर | संतोष सदाशिव खांबे व शिवंन्या संतोष खांबे |
| 20 | तुळींज-7 | NL07/475/2 | 6978 | ओम साई महालक्ष्मी बिल्डर्स व डेव्हलपर्स | मंजुला गणपत व्यास |

सही /-

प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती (बी) विरार पूर्व
वसई-विरार शहर महानगरपालिका

## जगात विकले जातात दोन अब्ज टी-शर्ट




१. न्यूयॉर्कमध्ये १८६८ मध्ये शोध लागल्यापासून टी-शर्टची पसंती दिवसागणिक वाढतच चालली आहे. आजघडीला जगभरात मिळून एक वर्षात जवळपास दोन अब्ज टी-शर्ट विकले जातात. प्रत्येक नागरिकाकडे किमान एक तरी टी-शर्ट असतोच. सुरुवातीला युनियन सूट नावाने ओळखला जाणारा टी-शर्ट हा अंतर्वस्त्राचा भाग होता.

२. कामगार मंडळी उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी या युनियन कोटचा वापर करायचे. टी-शर्टचा जनक अज्ञात असला तरी त्याचे मार्केटिंग १९०४ मध्ये कूपर अंडरवेअर कंपनीने 'बॅचलर अंडरशर्ट्स' नावाने सुरू केले. त्यावेळी टी-शर्ट म्हणजेच 'बॅचलर अंडरशर्ट्स' हे फॅशन म्हणून वापरले जात नव्हते.


३. १९०५ मध्ये टी-शर्ट अमेरिकन नौदलाचा गणवेश म्हणून समाविष्ट झाला. त्यानंतर दुसरे महायुद्ध सुरू झाले. युद्धसमाप्तीनंतर लष्करानेही टी-शर्ट स्वीकारला. १९२० मध्ये 'टी-शर्ट' हा शब्दप्रयोग लेखक एफ. स्कॉट फिट्झगेराल्ड यांनी त्यांच्या 'धिस साईड ऑफ पॅरेडाईज' या पुस्तकात केला. १९३० पर्यंत ना पुस्तक लोकप्रिय झाले, ना टी-शर्ट शब्द.

४. टी-शर्टला त्या काळात 'स्किव्हीज' किंवा 'जिमशर्ट' असे संबोधन होते. आताच्या टी-शर्टपेक्षा त्या काळातले टी-शर्ट खूपच पातळ होते. १९३९ मध्ये टी-शर्टची जाहिरात 'द विझार्ड ऑफ ओझ'ने केली. स्मिथसोनियन इन्स्टिट्यूटमधील सर्वात जुना प्रिंटेड शर्ट न्यूयॉर्कचे गव्हर्नर थॉमस ई. ड्युई यांच्या अध्यक्षीय मोहिमेचा भाग होता आणि त्यावर 'ड्यू-इट विथ ड्युई' असे लिहिले होते.

५. प्लास्टिसोलचा शोध १९५९ मध्ये लागला आणि तोपर्यंत टी-शर्टमध्ये वापरल्या जाणाऱ्या शाईपेक्षा तो अधिक टिकाऊ आणि ताणण्याजोगा ठरला. यामुळे डिझाइनमध्ये अधिक वैविध्य आले. मार्लन ब्रॅन्डोने पहिल्यांदा 'अ स्ट्रीट कार नेम डिझायर' या चित्रपटात टी-शर्ट परिधान केला होता. त्यावरून बराच वाद निर्माण झाला आणि देशभरात टी-शर्टच्या विक्रीत वाढ झाली. 'द वाइल्ड वन'मधील भूमिकेमुळे जीन्स लोकप्रिय करण्याचे श्रेयही ब्रँडोला जाते.

६. १९३४ मध्ये 'इट हॅपेंड वन नाईट' या चित्रपटात क्लार्क गॅबलच्या टॉपलेस भूमिकेमुळे टी-शर्टच्या विक्रीत घट झाली होती. ही कथा खरी आहे, असे सांगणारा कोणताही पुरावा नाही. १९५० च्या दशकाच्या सुरुवातीला पॉप कल्चर आयकॉन आणि स्लोगनसह टी-शर्ट सजवणारी ट्रॉपिक्स टोग्स ही पहिली कंपनी होती. यामुळे टी-शर्ट लोकप्रिय झाला. आजपर्यंत पॉप संस्कृती आणि व्यवसाय ब्रँडिंगचा टी-शर्ट एक आवश्यक भाग आहे.

७. रॉक अँड रोल बँडने ६० च्या दशकात टी-शर्ट अधिक लोकप्रिय केला आणि स्क्रीन-प्रिंटेड शर्टच्या माध्यमातून त्यांच्या संगीताचा प्रचार केला. ६० च्या दशकाच्या उत्तरार्धात टाय-डाई टी-शर्ट हा हिप्पी चळवळीचा मध्यवर्ती घटक बनला. ७० च्या दशकात पहिल्यांदाच टी-शर्टने सर्वसामान्यांच्या संस्कृतीत प्रवेश केला. ८० च्या दशकात त्याची लोकप्रियता वाढत गेली. याच दशकात सुरकुत्यामुक्त टी-शर्टचा जन्म झाला.



## बेडकांची स्मशानभूमी

**लंडन** : ब्रिटनमधील केंब्रिजजवळ शास्त्रज्ञांना एक धक्कादायक गोष्ट सापडली आहे. येथील बार हिलवर रस्त्याच्या कडेला केलेल्या उत्खननादरम्यान शास्त्रज्ञांना आठ हजार प्राचीन बेडकांची हाडे सापडली आहेत. २०१६ ते २०१८ दरम्यान लोहयुगात बांधलेल्या घराजवळ हे उत्खनन झाले. यादरम्यान १४ मीटर लांब आणि ६ फूट खोल खड्ड्यात ही हाडे सापडली आहेत.

बेडकांच्या या स्मशानभूमीपर्यंत पोहोचण्यासाठी शास्त्रज्ञांना एक मीटर वरची माती आणि सबसॉईल खणून काढावी लागली. एकाच ठिकाणी इतके अवशेष सापडणे हा एक असामान्य आणि विलक्षण शोध आहे. 'म्युझियम ऑफ लंडन आर्किओलॉजी-एमओएलए'चे वरिष्ठ पुरातत्त्व शास्त्रज्ञ विकी इवेन्स यांनी दिलेल्या माहितीनुसार, लंडनमधील अनेक ठिकाणांवर काम करत असताना इतक्या मोठ्या प्रमाणात बेडूक कुठेही आढळले नाहीत. एकाच खड्ड्यातून एवढी हाडे मिळणे आश्चर्यकारक आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ही हाडे मुख्यतः बेडूक आणि टॉडची आहेत. अश्मयुगात अनेक जण बेडूक खात असत. मात्र, खड्ड्यात सापडलेल्या हाडांवर कोणत्याही प्रकारचे कापलेले किंवा जाळल्याचे चिन्ह दिसले नाही. त्यामुळे लोकांनी हे बेडूक खाल्ले असे म्हणता येणार नाही. बेडूक उकडले असते तरीही त्याच्या खुणा सापडल्या असत्या. जिथून हे अवशेष सापडले, तेथे जळलेल्या धान्याचे पुरावे मिळाले आहेत. त्यावरून काही अभ्यासकांच्या मते, त्या काळातील लोक एकाच ठिकाणी पीक ठेवत असत. पिकांमुळे इतर कीटक तिथे आले असावेत आणि बेडूक त्यांना खायला आले असावेत. प्रागैतिहासिक काळातील बेडकांच्या या अवशेषामागे आणखी एक सिद्धांत दिला जात असून त्यानुसार बेडूक प्रजननासाठी या भागात आले असावेत आणि खड्ड्यात पडून अडकले असतील.





## सर्वात लहान माकड

**लंडन** : ईस्ट ससेक्स येथील ड्रिसेलस प्राणिसंग्रहालयाने जगातील सर्वात लहान माकडाचे स्वागत केले आहे. हे माकड ब्रोकोलीच्या म्हणजेच फुलकोबीच्या एका तुकड्यापेक्षा लहान दिसते.

ड्रिसेलस प्राणिसंग्रहालयात आलेली रोझी ही लहान दिसत असली तरी ती एक प्रौढ मादी आहे. तिचे वजन फक्त १०८ ग्रॅम आहे. भविष्यात लहान अर्भकांचे स्वागत करण्याच्या आशेने ती शेप्रेथ वन्यजीव उद्यानातून या प्राणिसंग्रहालय उद्यानात नर माकड बेनसोबत पोहोचली. प्राणिसंग्रहालयाचे प्राणी व्यवस्थापक मार्क केनवार्ड म्हणाले की, 'आम्ही काही काळापासून मादी पिग्मी मार्मोसेटचे स्वागत करण्याची अपेक्षा करत होतो आणि रोझी किती चांगल्या प्रकारे स्थायिक होत आहे याबद्दल आम्ही रोमांचित आहोत. एक-दोन दिवसातच आम्ही पाहिले की रोझी बेनच्या पाठीमागेच असते. तो जिथे जातो तिथे ती जाते. तिचे त्याच्यावर खूप प्रेम जडल्यासारखे वाटते. ही लहान माकडे सामान्यतः खूप लाजाळू असतात, परंतु रोझी थोडी अधिक आत्मविश्वास दाखवताना दिसते. पिग्मी मार्मोसेट हे सर्वात लहान माकड आहे आणि मूळचे दक्षिण अमेरिकेच्या वर्षावनातील पश्चिम ॲमेझॉनचे रहिवासी आहेत. अधिवास नष्ट होणे आणि परदेशी पाळीव प्राण्यांच्या व्यापारामुळे या प्रजातीला धोकादायक प्रजातींच्या यादीत असुरक्षित म्हणून वर्गीकृत केले गेले आहे. पिग्मी मार्मोसेट्स सेब्युएला वंशातील लहान न्यू वर्ल्ड माकडांच्या दोन प्रजाती आहेत. पिग्मी मार्मोसेटच्या एकूण संख्येपैकी सुमारे ८३ टक्के लोक दोन ते नऊ जणांच्या चमूत राहतात, ज्यात एक प्रमुख नर, एक प्रजनन मादी आणि सलग चार संततींचा समावेश आहे. बहुतेक गटांमध्ये कुटुंबातील सदस्यच असतात, परंतु काहींमध्ये एक किंवा दोन अतिरिक्त प्रौढ सदस्यदेखील असतात. छाती आणि जननेंद्रियाच्या भागातील ग्रंथींमधून स्त्राव वापरून रासायनिक इशारा मादी करते. मादी वर्षातून दोनदा जुळ्या मुलांना जन्म देते. पिग्मी मार्मोसेट माकडाचे डोके-शरीराची लांबी ११७ ते १५२ मिमी आणि शेपटी १७२ ते २२९ मिमी असते. सरासरी प्रौढ शरीराचे वजन फक्त १०० ग्रॅमपेक्षा जास्त असते. अंगावरील केसांचा रंग तपकिरी-सोनेरी, राखाडी आणि काळा आणि खालच्या भागावर पिवळा, केशरी यांचे मिश्रण असते. पिग्मी मार्मोसेट पश्चिम ॲमेझॉन खोऱ्यात, ब्राझिल, कोलंबिया, इक्वेडोर, पेरू आणि बोलिव्हियामध्ये आढळतात.



## बर्फामुळे जगबुडीची भीती!

**वॉशिंग्टन** : ग्लोबल वार्मिंगमुळे संपूर्ण सृष्टीच्याच विनाशाचा धोका निर्माण झाला आहे. संशोधक बऱ्याच काळापासून या घटनांबाबत इशारा देत आहेत. ग्लोबल वार्मिंगचा मोठा परिणाम हिमनद्यांवरील बर्फ वितळण्यावरही दिसून येत आहे. अंटार्क्टिका खंडातील 'डूम्सडे ग्लेशियर' देखील सतत वितळत आहे. याची सुरुवात कशी झाली यावर संशोधकांनी अभ्यास केला आहे.

अभ्यासानुसार, डूम्सडे ग्लेशियर, ज्याला थ्वेट्स ग्लेशियरदेखील १९४०मध्ये वितळण्यास सुरुवात झाली असून ते वेगाने वितळत आहेत. अंटार्क्टिका खंडावरील बर्फ याच वेगाने वितळत राहिले, तर पृथ्वीवरील जीवसृष्टीस मोठा धोका निर्माण होण्याची भीती संशोधकांना वाटत आहे.

डूम्सडे ग्लेशियरबद्दल शास्त्रज्ञांची चिंता वाढली आहे. त्याचा आकार अमेरिकेतील फ्लोरिडा राज्याइतका मोठा आहे. अंटार्क्टिका वितळल्यामुळे जगभरातील समुद्राच्या पातळीत वाढ होण्यामध्ये या हिमनगाचा पाच टक्के वाटा असल्याचे म्हटले जाते. एका जर्नलमध्ये याबाबतचा एक अभ्यास प्रसिद्ध झाला आहे. हा ग्लेशियर १९४० मध्ये झपाट्याने वितळू लागला, असे या अभ्यासात म्हटले आहे. यावेळी अधिक शक्तिशाली एल निनोमुळे बर्फ वितळण्याचा वेग अचानक वाढला आहे. अंटार्क्टिकातील हिमनगांचे सातत्याने वितळणे सुरूच असताना वितळलेला बर्फ मात्र पुन्हा तयार होत नसल्याने ही संपूर्ण जगभरासाठी धोक्याची घंटा ठरत आहे.

मानवी क्रियांमुळे होणाऱ्या ग्लोबल वार्मिंगमुळे आता त्याची भरपाई करणे कठीण होत असल्याचे या अहवालात म्हटले आहे. डूम्सडे ग्लेशियर सातत्याने वितळत असल्याने त्याच्या अचानक कोसळण्याचा धोका खूपच जास्त आहे. डूम्सडे ग्लेशियर अचानक कोसळला तर पाण्याची पातळी दोन फुटांनी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे जगभरात विनाशकारी पुराचा धोका निर्माण होईल, अशी भीतीही व्यक्त होत आहे. संशोधक सांगतात की, ग्लेशियर पूर्वीच्या अंदाजापेक्षा वेगाने वितळत आहे. त्यामुळे समुद्राच्या पाण्याच्या पातळीत दरवर्षी मोठा बदल होणार आहे.

## इथे उंदरांना घाबरतात मांजरी



**इसेक्स (लंडन)** : ब्रिटनमधले सर्वात अस्वच्छ शहर म्हणून इसेक्समधल्या जेविकची ओळख सांगितली जाते. अस्वच्छतेमुळे उंदरांचे साम्राज्य गावावर निर्माण झाले आहे. त्यामुळे मांजरी इथल्या उंदरांना घाबरतात.

वादळ, पाऊस यामुळे जेविक गावाची रयाच गेली. दहा वर्षांत या गावाने तीन वेळा अस्वच्छ शहरांचा किताब पटकावला. अस्वच्छतेमुळे गाव सोडून ग्रामस्थ इसेक्स आणि लंडनमध्ये स्थलांतरित झाले. प्रत्येक घर म्हणजे भंगारखानाच बनला आहे. गावातली घरेच्या घरे ओस पडलेली दिसतात. स्थानिक नागरिक फक्त नावालाच काय ते उरले आहेत. चार-दोन उंबऱ्यांनी स्वतंत्र झोपडी बांधून राहाणे सध्या पसंत केले आहे. अर्बन एक्सप्लोरर वेन्डॉल याने या गावाची सफर केली. अस्वच्छ गावात पाऊल ठेवल्यापासून गावाबाहेर कधी एकदा पाय ठेवतो, असे त्याला झाले होते. गावातले रस्ते खराब झालेल्या वस्तू, फर्निचरने भरलेले आहेत. बंद पडलेल्या घरांसमोरही नादुरुस्त वस्तूंचा ढीग जमा झाला आहे. समुद्रालगतचे हे गाव कोणे एकेकाळी टुमदार होते. आता या गावाच्या नावासोबत अस्वच्छता शब्द जोडला गेला आणि पाठोपाठ तिथल्या भोसकण्याच्या घटनांनीही गावाची अब्रू वेशीवर टांगली गेली. इथल्या अस्वच्छतेने कळस गाठला तरी स्थानिक प्रशासन फक्त या गोष्टी माहीत आहे, या ओळींपलीकडे काहीच बोलत नाहीत. गावावर आता उंदरांचे राज्य चालते.

## यान अन् उपग्रह अंतराळात धडकले असते, तर...

**वॉशिंग्टन** : सध्या रशिया-युक्रेन, इस्त्रायल-पॅलेस्टाईन या चार देशांमध्ये युद्ध सुरू आहे. यातील युक्रेन आणि इस्त्रायल हे अमेरिकेचे निकटवर्तीय देश आहेत. त्यामुळेच या युद्धात युक्रेनला सर्व प्रकारची मदत अमेरिकेकडून होत असल्याने अमेरिका आणि रशियामध्येही तणाव वाढला आहे. अशा परिस्थितीत अमेरिकन उपग्रहांना डोळ्यांसमोर ठेवून अंतराळातील अण्वस्त्रसज्जतेकडे रशियाचा प्रवास सुरू झाला आहे.



अमेरिकन उपग्रहांना लक्ष्य करून अंतराळात अण्वस्त्रे पेरण्याच्या रशियाच्या तयारीबद्दलचा गुप्तचर अहवाल समोर येत असतानाच नासाचे अंतराळ यान पृथ्वीच्या खालच्या कक्षेत रशियन उपग्रहाच्या अतिशय जवळून गेले असून त्याची धडक होता होता टळली. परंतु, या दोन देशांतील तणावाच्या पार्श्वभूमीवर जर दोन्ही उपग्रहांची अंतराळात धडक झाली असती तर काय झाले असते? असा प्रश्न सध्या जगभरात चर्चेत आला आहे. दरम्यान, मागील काही वर्षांपासून अंतराळातील कचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला असताना या घटनेमुळे अवकाशातील कचरा किती धोकादायक असू शकतो, हे या घटनेने दाखवून दिले आहे.



## जांभळ्या ताऱ्याचे रहस्य

**वॉशिंग्टन** : अवकाशातली रहस्ये उलगडणाऱ्या जेम्स वेब टेलिस्कोपने आतापर्यंत उत्तमातली उत्तम कामगिरी बजावली आहे. या दुर्बिणीद्वारे जवळपास ३७ वर्षांपूर्वी स्फोट झालेल्या ताऱ्याच्या कचऱ्यात तोही मध्यभागी जांभळ्या रंगाचा तारा असल्याचे दिसून आले आहे.

जवळपास ४०० वर्षांतला सर्वात प्रकाशमय असा स्फोट ३७ वर्षांपूर्वी अवकाशात झाला. 'एसएन १९८७ ए' या ताऱ्याचा स्फोट झाला. स्फोटानंतर त्यातून उत्सर्जित होणारा प्रकाश लोप पावण्यास सुरुवात झाली. अशा स्थितीतही त्याच्या केंद्रस्थानी जांभळ्या रंगाचा तारा दिसून आला. चार दशकांपासून या जांभळ्या ताऱ्याची भुरळ खगोलतज्ज्ञांना पडली आहे. नासाच्या जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने सुपरनोव्हाच्या ठिकाणी न्यूट्रॉन ताऱ्यापासून उत्सर्जन झाल्याचा आतापर्यंतचा सर्वोत्तम पुरावा शोधून काढला आहे. एसएन १९८७ ए म्हणून ओळखला जाणारा सुपरनोव्हा याचा गाभा अजूनही शिल्लक आहे. याचा अर्थ, त्याच्या गाभ्यातील अवशेष एक तर न्यूट्रॉन तारा किंवा कृष्णविवरात तरी रूपांतरित झाले असावेत. न्यूट्रॉन ताऱ्याच्या अस्तित्वाचे अप्रत्यक्ष पुरावे यापूर्वी सापडले आहेत, परंतु संभाव्य तरुण न्यूट्रॉन ताऱ्यापासून उच्च-ऊर्जा उत्सर्जनाचे परिणाम शोधण्याची ही पहिलीच वेळ आहे. सुपरनोव्हा म्हणजेच काही मोठ्या ताऱ्यांचा स्फोटक मृत्यू काही तासांतच स्फोटाद्वारे होतो आणि स्फोटाची चमक काही महिन्यांतच शिगेला पोहोचते. स्फोटक ताऱ्याचे अवशेष पुढील दशकांमध्ये दिसत राहातात. सुपरनोव्हा एसएन १९८७ ए चा स्फोट पृथ्वीपासून १,६०,००० प्रकाशवर्षे दूर मोठ्या मॅगेलानिक क्लाऊडमध्ये घडला. फेब्रुवारी १९८७ मध्ये पृथ्वीवर पहिल्यांदा त्याचे दर्शन झाले आणि त्याच वर्षी मे महिन्यात त्याची चमक शिगेला पोहोचली. १६०४ मध्ये केपलरच्या सुपरनोव्हाचे निरीक्षण झाल्यानंतर उघड्या डोळ्यांनी दिसणारी ही पहिली सुपरनोव्हा होती. एसएन १९८७ ए च्या पहिल्या दृश्य-प्रकाश निरीक्षणाच्या सुमारे दोन तास आधी जगभरातील तीन वेधशाळांमध्ये केवळ काही सेकंद टिकणाऱ्या न्यूट्रिनोचा स्फोट आढळला. दोन भिन्न प्रकारची निरीक्षणे एकाच सुपरनोव्हा घटनेशी जोडली गेली होती आणि कोर-क्रॅश (केंद्रकाचा स्फोट पावलेली) सुपरनोव्हा कशी होती याची माहिती यातून मिळाली. या प्रकारच्या सुपरनोव्हामुळे न्यूट्रॉन तारा किंवा कृष्णविवर तयार होईल, अशी अपेक्षा या सिद्धांतात होती. अवशेषांच्या मध्यभागी न्यूट्रॉन ताऱ्याच्या अस्तित्वाचे अप्रत्यक्ष पुरावे गेल्या काही वर्षांत सापडले आहेत.

## ४५०० वर्षांपूर्वीचे पहिले चुंबन!



**डेन्मार्क** : जगभरात शास्त्रज्ञ इतिहासातील रहस्यमय घटनांचा सतत शोध घेत असतात. या शोधातून जुन्या प्रथा, परंपरा आणि संस्कृतीबद्दलची खूप सारी माहिती मिळते. याबरोबरच त्या काळातील लोक कसे राहत होते, समाजव्यवस्था, चालीरिती हे यातून कळते. अशाच शोधातून जगातील पहिले चुंबन कधी घेण्यात आले होते, याची माहिती समोर आली आहे. तब्बल ४५०० वर्षांपूर्वी पहिले चुंबन घेण्यात आले होते, याचा पुरावाही शोधकर्त्यांना सापडला आहे. यापूर्वी ३५०० वर्षांपूर्वी पहिले चुंबन घेतल्याचे मानले जात होते.

हा शोध मध्य पूर्वच्या प्राचीन ठिकाणी लागला होता. हा शोध मेसोपोटामिया समाजात पहिले चुंबन घेतल्याची साक्ष देतो. याची नोंद २५०० इ.स. पूर्वीच्या प्राचीन ग्रंथामध्येही आहे. शोधकर्त्यांनी याचे प्रमाणही दिले आहे. यापूर्वीच्या शोधात चुंबनाचा पहिला पुरावा भारतात सापडला होता. १५०० इ.स.पूर्वीच्या प्राचीन भारतातला हा पुरावा होता. मात्र नवीन अभ्यासात आणि प्राचीन मेसोपोटामिया ग्रंथातून समजते की, ही मध्य पूर्वमधील एक रोमँटिक प्रथा होती. डेन्मार्कच्या कोपेनहेगन विद्यापीठातील मेसोपोटामिया इतिहास तज्ज्ञ डॉ. ट्रॉल पंक आर्बोल म्हणाले की, प्राचीन मेसोपोटामियामध्ये जो सुरुवातीच्या मानव संस्कृतींचे नाव मानले जाते. आताच्या इराक आणि सीरियामध्ये हा भाग मोडतो. युफ्रेट्स आणि टायग्रिस नद्यांच्या दरम्यान मेसोपोटामिया संस्कृती अस्तित्वात होती. त्यावेळी लोक मातींच्या पट्ट्यावर कलाकार लिपीमध्ये लिहीत होते. यात हजारो मातीच्या पट्ट्या आजही उपलब्ध आहेत आणि यात स्पष्ट पुरावा मिळतो की, चुंबनाला प्राचीन काळी रोमँटिक अंतरंगाचा एक भाग मानले जात होते.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 1, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, गजाराम को. ऑ.हौ.सो. चंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-9594418181 / 8424989898